REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

छत्रपती संभाजी महाराज व इंग्रज यांच्यातील संबंध

प्रा.डॉ.राजेंद्र गायकवाड
इतिहास विभाग प्रमुख, विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी
ता.माढा, जि.सोलापूर.

प्रस्तावना :

शिवरायांच्या जावळीच्या विजयानंतर स्वराज्याच्या सीमा पश्चिम किनारपट्टीच्या पोर्तुगीज, सिद्दी व इंग्रजांच्या प्रदेशाला जाऊन भिडल्या होत्या. मुंबई सुरूवातीला पोर्तुगीजांकडे होती. इ. स. १६६४ साली पोर्तुगीजांनी मुंबईला आंदण रूपात इंग्रजांना दिले. इंग्रज प्रथमपासून शिवरायांबरोबर सलोख्याचे संबंध ठेवून होते. इंग्रज प्रारंभी केवळ व्यापार करण्याच्या उद्देशाने सर्वाबरोबर सलोख्याने वागत होते. सुरतेच्या लूटीच्या प्रसंगी शिवरायांचा प्रथम इंग्रजांशी संबंध आला. पुरंदरच्या तहाच्या वेळी शिवरायांनी पूर्ण शरणागती स्वीकारली. अनेकांचा समज झाला स्वराज्याचा अध्याय संपला. इंग्रजांनाही असेच वाटले. क्षत्रियांच्या जीवनामध्ये असे चढउतार येत असतात. शिवराय यातून लवकरच सावरल्याचे दिसते. महाराजांनी आग्राभेटीनंतर विद्युत वेगाने एकेक गडकोट घेण्याचा सपाटा लावला. महाराजांनी आपला दबदबा पुन्हा निर्माण केला. इंग्रजासह सर्वांच्या मनात शिवरायांविषयी धास्ती निर्माण झाली. इंग्रजांचे बाहयरूप व्यापाऱ्याचे होते. तात्कालीन हिंदूस्तानाच्या राजकारणाची त्यांना नेमकेपणाने जाण होती. मराठी सत्तेच्या अल्प काळातील प्रगतीने अचंबित झालेल्या इंग्रजांनी मराठयांचा शत्रू सिद्दीला अंतर्गतरित्या दारूगोळा, बंदूका, दाणागोटा या सारखी मदत करण्याचे धोरण अवलंबिले. इंग्रजांचे सिद्दीविषयीचे हे धोरण शिवराय आणि इंग्रज यांच्यात कटुता उत्पन्न करणारे ठरले. शिवरायांच्या लष्कराने राजापूरची वखार लूटली. परिणामी दोघांच्या संबंधात अधिकच बिघाड झाला. चाणाक्ष इंग्रजांना शिवरायांचे शत्रूत्व तुर्तास तरी परवडण्यासारखे नव्हते. आपल्याला किमान नुकसानभरपाई तरी मिळावी या हेतूने इंग्रजांनी शिवरायांकडे अनेक वेळेस आपले वकील पाठवले. परंतू शिवराय अशा कुठल्याही नुकसानभरपाईसाठी तयार नव्हते. उलट ते तोफा, दारूगोळा यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची इंग्रजांकडे सतत मागणी करत होते. शिवरायांच्या राज्याभिषेक सोहळयाच्यावेळी रायगडावर इंग्रज वकील हेन्री ऑक्झींडन हजर होता. संभाजीराजांच्याकडे हाच वारसा चालत आला होता.

इंग्रजांनी हिंदूस्तानभर सूरत, मुंबई, मद्रास, कलकत्ता इ. ठिकाणी वखारी स्थापन केल्या होत्या. मराठी सत्तेचा संबंध मुंबईच्या इंग्रजांशी आला होता. सूरतेच्या वखारीतूनच हिंदूस्तानभरच्या वखारींचे कामकाज चालत होते. सूरत ही मोगलांच्या साम्राज्यातील वखार होती. मोगलांशी संघर्ष टाळण्यासाठीच सूरतकर इंग्रज मुंबईकरांना मोगल आणि सिद्दीला सहकार्य करण्याबाबत सांगत होते. मुंबईकरांना पावलोपावली संभाजीराजांच्या आक्रमणाची भीती होती. सूरतकरांच्या दुटप्पी धोरणाला मुंबईकर कंटाळले होते. कंपनीच्या प्रशासन व्यवस्थेमध्ये सूरतकर सर्वोच्च असल्याने मुंबईकरांचा नाईलाज होत होता. सूरतकरांच्या महेरबानीने सिद्दी कासम मुंबई बेटावर आश्रयाला येत जात होता. मुंबई बंदराच्या आश्रयानेच तो मराठयांच्या राज्यात हैदोस घालत होता. शिवरायांना इंग्रजांचे दुटप्पीधोरण परिचित होते. सिद्दीचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रजांचे पारिपत्य करणे गरजेचे आहे हे महाराज जाणून होते. सिद्दीला ठेचण्याची आशा मावळल्यानंतरच शिवरायांनी आपला मोर्चा इंग्रजांकडे वळविला. याचाच एक भाग म्हणून इ. स. १६७८-७९ मध्ये मुंबई बंदराच्या तोंडावर असलेले इंग्रजांच्या ताब्यातील खांदेरी बेट शिवरायांनी आपल्या ताब्यात घेतले. त्यावर तटबंदी उभारली. ही बातमी इंग्रजांना माहित होताच त्यांनी बेट पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न सलग दोन वर्षे प्रयत्न केला. यावेळी मोगलांनी या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी आपला आरमारी सेनापती सिद्दी कासीम याला पाठविले हाते.[१] परंतू या मोहिमेत मोगल आणि इंग्रज दोघांनाही अपयश आले. सिद्दीने उंदेरी बेट जिंकून घेतले. इंग्रजांनी चौलचा सुभेदार आण्णाजी दत्तो याच्याशी तहाची बोलणी करण्यासाठी आपला वकील राम शेणवी याला पाठविले. वाटाघाटी होऊन १८ जानेवारी १६८० साली उभयतांमध्ये एक महत्त्वपूर्ण तह घडून आला. त्या तहातील प्रमुख अटी अशा होत्या.

१. तुमच्या (इंग्रजांच्या) मदतीने आलेले सिद्दीचे आरमार आणि तुमचे आरमार तुम्ही काढून नेले पाहिजे.
२. आपण मुघलांचे नोकर आहोत अशा सबबीवर जर सिद्दीचे आरमार निघून जात नसेल तर तूम्ही त्यांना कोणत्याही प्रकारची मदत, दारूगोळा, होडया इत्यादी पूरवू नये. खंदेरीहून त्याचे आरमार हलणार नाही तोपर्यंत आम्ही मुंबईत एक बातमीदार आणि दहा माणसे ठेवून तुम्ही हे कलम कसे पाळता ते पाहू.
३. नागोठाणे आणि पेणच्या खाडीत आमच्या कोणाही शत्रूला प्रवेश देऊ नये आणि आता आपले वैर चालू असताना सिद्दीने येऊन पुष्कळ कैदी धरून नेले ते परत करण्यास त्याला सूचवावे. यापुढे कोणत्याही कारणासाठी त्याला या खाडीत प्रवेश देऊ नये.

४. सिद्दीच्या नोकरीत असलेल्या दाऊदखानाने आमच्या मुलखात येऊन आमचे पुष्कळ नुकसान केले आहे. म्हणून तुम्ही त्याला बेटावरून काढून लाविले पाहिजे.[२]

शिवरायांना इंग्रजांशी तह करून मराठी मुलुखातील सिद्दीचा उपद्रव कमी करायचा होता. या तहातील अटीवरून संभाजीराजे, इंग्रज आणि सिद्दी यांच्या संबंधावर प्रकाश टाकता येतो. शिवरायांच्या निधनामुळे या तहाची अंमलबजावणी इंग्रजांनी प्रत्यक्षात कशी केली हे राजांना पाहता आले नाही.

शिवरायानंतर संभाजीराजे स्वराज्याचे वारसदार झाले. संभाजीराजे पन्हाळागडावर असताना इंग्रजांनी अर्ज पाठवून आपल्या नुकसानभरपाई विषयी विचारणा केली. यावर ''सध्या आपण अन्य कामात गुंतल्यामुळे तुमच्या अर्जावर आत्ता विचार करता येणार नाही.'' असे नकारदर्शक उत्तर दिले. इंग्रजांचे वर्तन शिवरायांशी केलेल्या तहाशी विसंगत होते यास्तव संभाजीराजांना इंग्रजांच्या अर्जाचे महत्त्व वाटले नाही. तहानंतरही सिद्दी राजरोसपणे मुंबईच्या आश्रयाने पेण-नागोठाणे या भागात लूटालूट करीत होता. इंग्रजांना धडा शिकविण्यासाठी संभाजीराजांनी आपले सैन्य राजापूरच्या वखारीजवळ जमविले. सैन्याचा हल्ला होईल या भीतीने इंग्रज निघून न जाता वखारीतच अडकून राहिले. इंग्रजांना वखारीतील मालमत्ता आणि माणसे सोडविण्यासाठी संभाजीराजांची परवानगीची आवश्यकता होती. इंग्रजांच्या सततच्या दुटप्पी धोरणामुळे संभाजीराजे इंग्रजांवर दात धरून होते. सिद्दीच्या बंदोबस्तासाठी व इंग्रजांच्या भूमिकेविषयी अधिक माहिती घेण्यासाठी संभाजीराजांनी आवजी पंडीत नावाच्या आपल्या धूर्त आणि निष्णात वकीलाला २० नोव्हेंबर १६८० रोजी मुंबईला इंग्रजांकडे पाठवून दिले. वकीलाने इंग्रजांना स्पष्ट शब्दात सूनावले की, इंग्रजांनी सिद्दीला सहकार्य करण्याचे सोडले नाही, तर संभाजीराजे मुंबईवर हल्ला करतील. यावेळी सिद्दी आरमारासह मुंबईतून बाहेर पडून सूरतेला गेल्याने इंग्रज संभाजीराजांच्या कोपातून वाचले. आवजी पंडीत काही काळ मुंबईत राहून इंग्रजांच्या हालचालीवर लक्ष ठेवत होता. इंग्रजांनी त्याची उत्तम बडदास्त ठेवून तो जाताना त्याच्यासोबत त्याला आणि संभाजीराजांना नजराणा पाठवून दिला. सिद्दीची खोड काही मोडत नव्हती. त्याने १६ मार्च १६८१ रोजी मुंबईस जाणारी मराठयांची २ गलबते व ४ माणसे पकडली. चौल येथे ३००० सैन्सासह मराठा अधिकारी बसला होता. त्याची सिद्दीच्या हालचालीवरती बारकाईने नजर होती. त्याने इंग्रजांना संभाजीराजांची भीती दाखवून सिद्दीकडून सर्व लूटीचे सामान परत करण्यास इंग्रजांना भाग पाडले.

संभाजीराजांचे सिद्दी व इंग्रजांना प्रतिउत्तर

इंग्रजांच्या सहकार्यामुळेच सिद्दी मराठी मुलुखात उपद्रव घालीत होता. सिद्दीच्या बंदोबस्तासाठीच संभाजीराजांनी उंदेरी बेट घेण्याची योजना आखली होती. यासाठी त्यांनी सिद्दीचे शत्रू अरब यांचे सहकार्य घेतले. १६८१ सालचा संभाजीराजांचा उंदेरीवरील हल्ला सिद्दीने यशस्वीपणे परतवून लावला. सूरतकर इंग्रज हे सिद्दीधार्जिणे असल्याने ते मुंबईकरांना सतत संभाजीराजांशी मैत्रीचा व गोडी गुलाबीने राहण्याचा सल्ला देत होते. इंग्रजांचा हा दुटप्पीपणा संभाजीराजांच्या लक्षात येत होता. त्यामुळेच त्यांनी इंग्रजांनी आपल्या मुलखातून अन्नधान्य नेऊ नयेत असे जाहीर केले. १६८३ साली संभाजीराजे आणि अरबांच्या संयुक्त आरमाराने इंग्रजांच्या 'प्रेसिडेंट' या जहाजावरती हल्ला केला. यात ११ इंग्रज मेले तर ३५ जखमी झाले.

मराठयांनी मुंबईकरांच्या शेजारील माहीम, कोळवा, दंतोरा, सारगाव व सुपारा ही ठाणी घेऊन मुंबईची नाकेबंदी आरंभली. मुंबईकर हल्ल्याच्या भीतीने धास्तावले होते. सूरतकरांनी मुंबईच्या संरक्षणाची काहीच व्यवस्था केली नव्हती. केवळ कोटांच्या भिंतीचाच संरक्षणासाठी आधार होता. मुंबईकरांची परिस्थिती इतकी वाईट झालेली होती की, त्यांच्याजवळ आपल्या रहिवाशांना पूरेल इतकेही अन्नसामग्री नव्हती. इतक्यात मुंबईजवळच्या कारंजा बंदराचा ताबा मराठयांस मिळाल्यामुळे मुंबईकर घाबरले. त्यांनी यातून मार्ग काढण्यासाठी सूरतकरांना सल्ला विचारला. सूरतकरांनी सल्ला देण्याचे तर दूरच राहीले उलट सांगितले की, संभाजीराजे आक्रमण करणार नाहीत. त्यामुळे आपण निश्चिंत राहावे. मुंबईकरांना हा सल्ला काही मानवला नाही. सूरतकरांच्या नेहमीच्या शैलीला कंटाळून मुंबईकरांनी चाइल्ड व वॉर्ड याच्या जुलमी वर्तनुकीस कंटाळून त्यांच्याविरूध्द बंड केले. दि. २८ डिसेंबर १६८३ रोजी इंग्लंडच्या चार्लस राजाने मुंबई बेट ताब्यात घेतल्याचे जाहीर केले आणि मुंबईला गव्हर्नर म्हणून रिचर्ड केजविनची नेमणूक करण्यात आली. [३] केजविनने पदावर आल्यावर सुरूवातीलाच संभाजीराजाबरोबर सूरतकरांचे धरसोडपणाचे धोरण सोडून मैत्रीपर्ण संबंध स्थापन केले. मुंबईच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी आपल्यावर घेतली. मुंबई बंडाची हकीकत वॉर्डने सूरतेला दिली. त्याने लिहिले की, ''मुंबईचे रहिवाशी सूरतकरावर चिडल्याचे आणि गव्हर्नर केजविन हा मुंबई बंदर संभाजीराजांना ४००० पागोडयांना विकणार आहे.'' केजविनने चार्लस राजाला लिहिलेल्या २८ जानेवारी १६८४ रोजीच्या पत्रात तो संभाजीराजांचा उल्लेख आपला सर्वात बलवान शेजारी असा करतो. यावरून संभाजीराजांची कीर्ती सातासमुद्रापलीकडे गेल्याचे खुद्द इंग्रजांच्याच पत्रव्यवहारावरून समजते. सिद्दीने यादरम्यान संभाजीराजांच्या मुलुखातून मूले पळवून नेऊन मुंबईला विकण्याचा नवीनच प्रकार सुरू केला. संभाजीराजांनी यादरम्यान कारंजा बेटावर कब्जा मिळविला.

१६८४ सालचा तह इंग्रज व संभाजीराजांमधील संबंध

मुंबईचा गव्हर्नर केजविन याने संभाजीराजांबरोबर मैत्रीपूर्ण तह करण्यासाठी २६ एप्रिल १६८४ च्या सुमाराला कॅ. गॅरी, थॉमस विल्किन्स व दुभाषा राम शेणवी यांना बिरवाडी येथे संभाजीराजांच्या भेटीला पाठवून दिले. इंग्रजांच्या प्रतिनिधींनी गव्हर्नरचा मनोदय संभाजीराजांना सांगितला. याला प्रत्युत्तर देताना संभाजीराजांनी सांगितले की, इंग्रजांनी सिद्दीला आश्रय देण्याचे थांबवल्याशिवाय आपले संबंध वृध्दींगत होणार नाहीत. तुमचा मित्र तो आमचा मित्र आणि तुमचा शत्रू तो आमचा शत्रू. यावेळी इंग्रज आणि सिद्दी यांच्या संबंधात तणाव निर्माण झाल्याचीही संभाजीराजांना कल्पना होती. या धोरणानुसार दोघांमध्ये तह घडून आला. या तहातील ११ कलमे कर्नाटकांशी तर ३० कलमे मुंबईशी निगडीत होती. या तहातील अटींना राजांनी मान्यता दिली. तहातील कर्नाटकांसंबंधी काही कलमे खालीलप्रमाणे होती :-

१. इंग्रजांशी व्यापार करण्यासाठी जे व्यापारी, रंगारी व विणकर येतील आणि ज्यांच्याजवळ इंग्रजांचा माल असेल त्यास हवालदार किंवा सुभेदारांनी त्रास देऊ नये. उलट त्यांस शक्य ती मदत करावी.
२. माझ्या राज्यातील एखादा व्यापारी किंवा रहिवाशी यांनी काही जिन्नस किंवा व्यापारी माल घेऊन इंग्रजांचे किंवा त्यांच्या व्यापाऱ्यांचे देणे लागत असेल व ते देत नसेल तर त्याला सुभेदाराकडे किंवा अधिकाऱ्याकडे नेले जाईल व तो जर खरोखरच देणे लागत असेल तर त्याच्या मान इतमामाकडे न पाहता कर्जफेड करावयास लावली जाईल.
३. इंग्रजांना माझ्या राज्यातील कोणाही माणसास गुलाम किंवा ख्रिश्चन करण्यासाठी विकत घेता येणार नाही.
४. वादळामुळे किंवा अन्य उत्पातामुळे जर एखादे जहाज, गुराब किंवा होडी माझ्या राज्यातील एखाद्या बंदरात लागली तर ती जप्त करून सरकारजमा करू नये. हा रिवाज इतर ख्रिश्चन लोकांच्याबाबत रूढ असेल तर ती सवलत इंग्रजांसही दिली जाईल.
५. इंग्रजांची सूचना अशी की, जर इतर ख्रिश्चन व्यापाऱ्यांना वर निर्देशित केलेल्या सवलतीपेक्षा अधिक सवलती मिळत असतील तर त्या त्यांनाही मिळाव्यात. तरी अशा सवलती इंग्रजांना मिळतील.

याच तहात मुंबईसंबंधी काही कलमे खालीलप्रमाणे होती.

१. माझ्या नोकरांकडून जो काही ताप इंग्रजांस दिला गेला किंवा माझ्याशी जे त्यांचे भांडण झाले ते त्यांनी विसरून त्याचा विचार काढू नये किंवा त्याबद्दल आकस ठेवू नये. मीही तसेच करावे हा तह झाल्यानंतर जर काही कमी जास्ती चुकुन घडले तर त्याचाही विचार न करता एकमेकांशी बोलून मैत्री राखावी. हा मुद्दा मान्य आहे.
२. माझा आणि इंग्रजांचा जो तह झाला आहे त्यात जर कोणी मतभेदाचा प्रश्न काढला तर तो दोघांनी विचारविनिमय करून मिटवावा. तहास कोणत्याही प्रकारे बाधा आणू देऊ नये. दोघास मान्य.
३. माझे आणि मोघलांचे सारखे युध्द चालू आहे. त्यात माझ्या लोकांनी मुघल प्रदेशात लुटमार करताना जर इंग्रजांच्या वखारीची लूट केली व माल नेला तर तो माल सुभेदारांनी किंवा हवालदारांनी परत करावा. तसेच एखादे वेळी जर आमच्या वखारीचे लोक किंवा अडते कैद केले गेले तर त्यास त्रास न देता सोडून द्यावे.
४. माझी व मोगलांची गलबते समुद्रात वावरतात तरी मुघलांचे एखादे जहाज माझ्या लोकांनी धरले आणि त्यात जर इंग्रजांचा माल असला व त्याच्यावर त्यांच्या खुणा वगैरे असल्या तर त्या खुणा वगैरे पटवून दिल्यास त्यांना त्यांचा माल परत मिळावा. इंग्रजांनीही धरलेल्या जहाजात, होडयात माझ्या प्रजेचा माल आढळल्यास तो त्यांनी माझ्या प्रजेस परत द्यावा. दोघांस करार मान्य.
५. पार्तुगीज, डच व इंग्रजांत लढा चालू आहे. तरी आम्ही इंग्रजांना किंवा त्यांना लढयात मदत करणार नाही. इंग्रज व माझ्यात झालेला तह विनाविरोध पाळला जावा.
६. फोर्ड सेंट जॉर्जच्या कलमातील ३,६,७,९ व ११ कलमे मुंबईकरांनाही लागू होतात.
७. इंग्रजांनी सूचना केली की, सूभेदारांनी मुंबईस वकील पाठवू नये. माझ्याशिवाय कोणीही वकील पाठविणार नाही. मोठा व महत्त्वाचा प्रश्न असेल तर मीच वकील पाठवीन. परंतू इतर वेळी सामान्य बाबतीत सुभेदार एखाद्या माणसाबरोबर पत्र पाठवतील व उत्तर नेतील.
८. इंग्रजांनी असे सूचविले की त्यांचे सिद्दीशी वाकडे आले आहे. तेंव्हा जर अशा परिस्थितीत माझी मदत लागली तर ती मी देईन.
९. इंग्रजांनी असे सूचविले की, त्यांच्या फत्तेमारीस जाण्यायेण्यास पूर्ण मुभा असावी. त्यांनी आणलेली व नेलेली पत्रे बिनविरोध जाऊ द्यावी. असल्या फत्तेमारीशी इंग्रजांच्या सीलासह जी पत्रे आणली जातील तेवढीच फक्त तपासल्यानंतर अडविली जाणार नाहीत.[४]

संभाजीराजांनी इंग्रजांशी केलेल्या तहातील कलमांवरून संभाजीराजे इंग्रजांबरोबरील जुन्या भांडणाचा कायमचा निकाल लावण्यात यशस्वी झाल्याचे दिसते. शिवाय या तहाचे काही ठळक परिणाम सांगता येतील त्यामध्ये इंग्रजांचा वैरी झालेला सिद्दी संभाजीराजांच्या हयातीपर्यंत मराठी मुलुखाला उपद्रव देण्यास पुन्हा आला नाही, इंग्रजांसारखी आरमारी ताकद संभाजीराजांना आपल्या बाजूला आणता आली, इंग्रजांनाही मोगलांच्या जुलुमशाहीपासून स्वतःच्या रक्षणासाठी मराठयांच्या सामर्थ्याचा उपयोग होणारच होता. थोडक्यात दोन्हीही सत्तांना याचा फायदा झाला. इंग्रजांना संभाजीराजांच्या राज्यकारभाराची पुरती कल्पना आलेली होती. त्यामुळे त्यांना मोगलांपेक्षा संभाजीराजांची मैत्री अधिक महत्त्वाची वाटते. सुभेदार सरकारकून राजांच्या पूर्ण आज्ञेत आहेत. याचीही त्यांना जाणीव झाली होती. शिवाय इंग्रजांच्या सर्व पत्रव्यवहारात चुकूनही संभाजीराजांच्या व्यक्तिदोषांचा उल्लेख येत नाही, ही विशेष लक्षात घेण्याची बाब आहे. संभाजीराजांच्या राजकीय कारकीर्दीतील इंग्रजांविषयीचे धोरण महाराजांच्या राजकीय मुत्सद्दीपणाचे दर्शन घडवते. एकाच वेळी अनेक आघाडयांवर मोठया चतुराईने व्यूहरचना करण्यात

संभाजीराजांची असणारी हातोटी यातून दिसते. हिंदुस्थानातील इतर राज्यकर्त्यांनीही जर शिवराय व संभाजीराजांप्रमाणे इंग्रजविषयक धोरण राबवले असते तर कदाचित देशाचे चित्र वेगळे दिसू शकले असते.

संदर्भ :

१. न. चि. केळकर, द. वि. आपटे, शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १४, ले.२२५४; श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.
२. केळकर, तत्रैव, ले.२२११.
३. डॉ. गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००१, पृ; १४३.
४. वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड भाग-१, शिवकाळ, म. रा. सा. सं. मं; मुंबई, २००६, पृ; २३९-२४४.